**प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गंत "किमान कौशल्य विकास कार्यक्रम" या जिल्हास्तरीय सर्वसाधारण योजनेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/प्र.क्र.५६/अभियान-१**
२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १६ मार्च, २०१७.

वाचा : १) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/प्र.क्र.१९५/रोस्वरो-१, दिनांक ०३ ऑगस्ट, २०१५.
२) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/प्र. क्र.१२२/रोस्वरो-१, दिनांक ०२ सप्टेंबर, २०१५.
३) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/प्र.क्र.३७/अभि-१, दिनांक २३ नोव्हेंबर, २०१५.

**प्रस्तावना :**

राज्यातील युवक-युवतींचे कौशल्य विकासाद्वारे सक्षमीकरण करुन त्यांना अधिक मागणी असलेल्या उद्योग, सेवा व तत्सम क्षेत्रात रोजगार/स्वंयरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान राबविण्यास या विभागाच्या दिनांक ०२ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील अ.क्र.९.२ मध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक जिल्ह्याच्या स्थानिक विशेष गरजांनुसार अथवा स्थानिक औद्योगिक आस्थापनांकडून तसेच उपलब्ध रोजगार/स्वयंरोजगाराच्या संधींच्या अनुषंगाने कौशल्य विकास योजनेंतर्गत विशिष्ट मागणीचे अभ्यासक्रम राबविण्याची गरज लक्षात घेता प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा नियोजन समितीमार्फत स्वतंत्र निधीची तरतूद करणे व त्यास शक्ती प्रदत्त समितीची मान्यता घेऊन कार्यवाही करणेबाबत तरतूद आहे.

सदर शासन निर्णयानुसार अभियानाची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा नियोजन समितीने (DPC) कौशल्य विकास योजनेकरिता निधी राखून ठेवण्याबाबतचा तसेच इतर बाबींसंदर्भातील धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता होती. प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानासंदर्भातील धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली विभागाच्या दिनांक ०३/०८/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये शक्ती प्रदत्त समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीच्या दिनांक ०३/११/२०१५ रोजीच्या बैठकीच्या कार्यवृत्तानुसार सन २०१६-१७ या वित्तीय वर्षापासून जिल्ह्याच्या वार्षिक योजनेसाठी मंजूर केलेल्या नियतव्ययामधून किमान रुपये ३.०० कोटी इतका नियतव्यय कौशल्य विकास योजनेसाठी राखून ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार नियोजन विभागाने जिल्ह्याच्या वार्षिक योजनेमध्ये "**किमान कौशल्य विकास कार्यक्रम**" या योजनेची नोंद नियोजन विभागाच्या संगणकीय प्रणालीवर

(MPSIM) घेण्यात येऊन प्रत्येक जिल्ह्याकरिता लेखाशिर्ष निर्माण करण्यात आले आहे. तथापि, सदर योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपद्धती विहित करणारा शासन निर्णय विभागाकडून निर्गमित करण्यात आलेला नाही. त्यामुळे अभियानासाठी जिल्ह्याच्या वार्षिक योजनेमधून जिल्हा नियोजन समितीकडे नियतव्यय प्रस्तावित/मागणी करणे, योजनेच्या खर्चावर नियंत्रण ठेवणे, उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे इत्यादी कार्यवाहीसाठी "**किमान कौशल्य विकास कार्यक्रम**" या जिल्हास्तरीय सर्वसाधारण योजनेच्या कार्यपद्धती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :

प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत जिल्ह्यातील विशिष्ट भौगोलिक तथा सामाजिक स्थिती, परंपरागत व्यवसाय, नैसर्गिक संसाधने तथा साधनसामुग्री इत्यादींच्या आधारे जिल्ह्यातील रोजगार/स्वयंरोजगारासाठी अधिक मागणी असलेली क्षेत्रे निश्चित करून या क्षेत्रांच्या कौशल्याच्या मागणीनुसार विशिष्ट अभ्यासक्रम राबविणे. तसेच प्रशिक्षणप्राप्त उमेदवारांना रोजगार/स्वयंरोजगारासाठी सहाय्य करणे या उद्दिष्टाकरिता "**किमान कौशल्य विकास कार्यक्रम**" या जिल्हास्तरीय सर्वसाधारण योजनेस या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपद्धती खालील प्रमाणे राहील.**

**(अ) जिल्ह्यात कौशल्य तथा उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे**.

या योजनांतर्गत जिल्ह्यातील विशिष्ट भौगोलिक तथा सामाजिक स्थिती, परंपरांगत व्यवसाय, नैसर्गिक संसाधने तथा साधनसामुग्री इत्यादींच्या आधारे विविध क्षेत्रातील रोजगार/स्वयंरोजगारासाठी कौशल्याच्या मागणीनुसार १५ ते ४५ वयोगटातील उमेदवारांकरिता राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT), सेक्टर स्किल कौन्सिल (SSC), नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (NSDC), राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद (SCVT), विद्यापीठे, केंद्र व राज्य शासनाने तसेच त्यांच्या अधिपत्याखालील सार्वजनिक उपक्रम/महामंडळे व महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था (MSSDS) इत्यादींनी मान्यता दिलेले अभ्यासक्रम जिल्हा कौशल्य विकास समितीमार्फत निश्चित करण्यात येतील. तथापि, सदर अभ्यासक्रम NSQF च्या स्तराशी सुसंगत असणे बंधनकारक राहील.

२. त्याचप्रमाणे, जिल्हा स्तरावरील उत्पादन, सेवा व किरकोळ व्यापार इत्यादी क्षेत्रातील आस्थापनांना लागणारे विशिष्ट कौशल्यप्राप्त मनुष्यबळ तयार करण्यासाठी आवश्यक असलेले Tailor made अभ्यासक्रम जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीच्या मान्यतेने राबविण्यात येतील. याकरिता जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती त्यांचे स्तरावर जिल्ह्यातील मागणी असलेल्या विशिष्ट क्षेत्रातील मनुष्यबळ निर्मिती व कौशल्य विकास कार्यक्रमासाठी अभ्यासगटाची स्थापना करण्यात येईल. सदर अभ्यासगटात खालील सदस्यांचा समावेश राहील.

१. संबंधित क्षेत्रातील औद्योगिक आस्थापना अथवा औद्योगिक संघटनेचे प्रतिनिधी

२. संबंधित क्षेत्रातील अग्रगण्य शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी

३. संबंधित क्षेत्रातील तज्ञ-प्रशिक्षक

२.१ सदर अभ्यासगटामार्फत खालील कार्यवाही करण्यात येईल.

अधिक मागणी असलेल्या विशिष्ट क्षेत्रातील कौशल्ययुक्त मनुष्यबळासाठी आवश्यक Job Role करिता National Occupation Standards (NOS) व Qualification Packs (QPs) तयार करुन सदर अभ्यासक्रम NSQF स्तराशी सुसंगत करणे.

अभ्यासगटांतील सदस्यांना शासनाच्या प्रचलित नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता तसेच जिल्हा कौशल्य समितीने निश्चित केलेल्या दराने मानधन अनुज्ञेय राहील.

३. "किमान कौशल्य विकास कार्यक्रम" या योजनेंतर्गत प्रशिक्षणासाठी इच्छूक संस्थांकडून जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीमार्फत इरादापत्र (EoI) मागवून कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/प्र.क्र.३७/अभि-१, दिनांक २३/११/२०१५ मधील निकषांची पूर्तता करणाऱ्या सुयोग्य संस्थांची प्रशिक्षणासाठी निवड करण्यात येईल. इरादापत्रामध्ये इच्छूक कौशल्य प्रशिक्षण संस्थेने प्रशिक्षण खर्चाच्या प्रतिपूर्तीचे दर नमूद करणे आवश्यक राहील. सदर दरामध्ये उमेदवारांचे परिचालन (Mobilization), समुपदेशन, मार्गदर्शन, निवासी/अनिवासी प्रशिक्षण, उमेदवारांना रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे व तद्नंतरचा पाठपुरावा करणे इत्यादी बाबींवरील खर्चाचा समावेश राहील. तथापि, सदर दर कौशल्य विकास व उद्योजकता विभागाने वेळोवेळी निश्चित केलेल्या दराच्या कमाल मर्यादेत असणे आवश्यक राहील. संस्थांची निवड करताना त्यांनी इरादापत्रात नमूद केलेले प्रशिक्षण खर्चाच्या प्रतिपूर्तीचे दर, प्रशिक्षणांती यशस्वी उमेदवारांसाठी रोजगार/स्वयंरोजगाराची उपलब्धता तसेच याद्वारे त्यांना प्राप्त होणारे मासिक वेतन/उत्पन्न इत्यादी बाबींचा विचार करण्यात येईल.

४. जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीने निवड केलेल्या सुयोग्य संस्थेने महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीकडे सूचीबद्ध होणे बंधनकारक राहील. तसेच सदर योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांची नोंदणी सदर संस्थेने महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या वेब पोर्टलवर करणे बंधनकारक राहील.

५. रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्याबाबतचे निकष, प्रशिक्षणोत्तर रोजगार/स्वयंरोजगार प्राप्तीकरिता सहाय्य, रोजगार प्राप्ती नंतरच्या पाठपुराव्याचा कालावधी व कार्यपद्धती, प्रशिक्षणार्थ्यांच्या बायोमॅट्रीक हजेरी बाबतचे निकष इत्यादी बाबीं सदर्भातील तरतूदी विभागाच्या दिनांक ०२/०९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार अथवा शासनाने वेळावेळी विहित केल्यानुसार लागू राहतील. तथापि, सदर संस्थांना प्रशिक्षण खर्चासाठी अदा करावयाच्या प्रतीपूर्ती रक्कमेचे टप्पे निश्चित करण्याचे अधिकार जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीस राहतील.

६. प्रशिक्षणांती उमेदवारांचे मुल्यमापन त्रयस्थ संस्था/व्यक्ती, विभागाच्या दिनांक २३/११/२०१५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेल्या निकषांची पुर्तता करणाऱ्या मुल्यमापन संस्था/

व्यक्ती यांचेमार्फत करण्यात येईल. मुल्यमापन संस्था/व्यक्ती यांना कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या दिनांक ०२/०९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार तसेच यात वेळोवेळी शासनाने केलेल्या सुधारीत दराने मुल्यमापन शुल्क अनुज्ञेय राहील. प्रशिक्षणांती यशस्वी उमेदवारांना राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT), सेक्टर स्किल कौन्सिल (SSC), नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (NSDC), राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद (SCVT), विद्यापीठे, केंद्र व राज्य शासनाने तसेच त्यांच्या अधिपत्याखालील सार्वजनिक उपक्रम/महामंडळे व महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था (MSSDS) इत्यादींनी मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमांकरिता संबंधीत अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र देण्याबाबत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांचेमार्फत मदत करण्यात येईल.

**ब) रोजगारासाठी अधिक मागणी असलेल्या व स्वयंरोजगारासाठी वाव असलेल्या क्षेत्रांतील जिल्ह्यातील इतर कौशल्य विकास प्रशिक्षण योजनांना मदत करणे.**

७. या योजनांतर्गत जिल्हा स्तरावर राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विकास प्रशिक्षण योजनांना जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीच्या मान्यतेने सहाय्यभूत/पुरक सेवा उदा. निवासी सेवा, प्रवास खर्च, व्यावसायिक सेवा, प्रचार, प्रसिध्दी व प्रसार, प्लेसमेंट्स, टूल किट्स पुरविणे इ. अनुषंगिक सेवा म्हणून एक किंवा एकापेक्षा अधिक सेवा पुरविण्याकरिता तसेच जिल्ह्याचा कौशल्य कमतरता अभ्यास (Skill Gap Study) करण्याकरिता आवश्यक तो निधी पुरविण्यात येईल. प्रवास खर्चातंर्गत उमेदवारांना त्यांच्या निवासस्थानापासून प्रशिक्षणाच्या ठिकाणापर्यंत ये-जा करण्यासाठी प्रत्यक्षात असलेल्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेनुसार बस/रेल्वे भाडे अदा करण्याबाबत आवश्यकतेनुसार जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीस निर्णय घेता येईल. तथापि, सदर बाबींकरिता राज्यस्तरीय कौशल्य प्रशिक्षण योजनेंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येऊ नये.

८. जिल्ह्यातील कौशल्य प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांना आवश्यकतेनुसार जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीच्या मान्यतेने केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांमध्ये दिलेल्या जिल्ह्यांच्या वर्गीकरणानुसार (PMKVY Guidelines २०१६-२०२०) खालील नमूद दराने भोजन व निवास खर्च अनुज्ञेय राहील. (परिशिष्ट-अ)

| **अ. क्र.** | **वर्ग** | **शुल्क (प्रति प्रशिक्षणार्थी प्रति दिन)** |
|---|---|---|
| १ | अ वर्गात समाविष्ट जिल्हे (X Category Districts) | रु. ३००/- |
| २ | ब वर्गात समाविष्ट जिल्हे (Y Category Districts) | रु. २५०/- |
| ३ | क वर्गात समाविष्ट जिल्हे (अ व ब वर्गीय जिल्ह्यात समाविष्ट नसलेले उर्वरित जिल्हे) (Z Category Districts) | रु. २००/- |

प्रवास/वाहतुक खर्च आणि भोजन व निवास या बाबींवरील खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या टप्यांबाबतचा (Payment milestones) निर्णय जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती घेईल.

९. या योजनेसाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना नियंत्रण अधिकारी म्हणून व जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र कार्यालयातील सहायक संचालक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. प्रस्तूत योजनेसाठी जिल्हा नियोजन समितीकडे नियतव्यय प्रस्तावित/मागणी करणे, संबंधितांना खर्चाची प्रतिपुर्ती करणे, योजनेच्या खर्चावर नियंत्रण ठेवणे, उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे इत्यादी कार्यवाही सहायक संचालक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांनी करावी.

१०. प्रस्तूत योजनेसाठी जिल्हानिहाय उपलब्ध होणाऱ्या निधीपैकी प्रशासकीय बाबींवर ५% निधीच्या कमाल मर्यादेत खर्च करण्यात यावा. या निधीतून अभ्यासगटांतील सदस्यांना शासनाच्या प्रचलित नियमानुसार प्रवास व दैनिक भत्ता तसेच जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीने निश्चित केलेल्या दराने मानधन तसेच इतर कार्यालयीन बाबींवरील खर्च भागविण्यात येईल.

११. संबंधित जिल्ह्याच्या मागणी क्रमांकाखाली २२३०-कामगार व सेवायोजन या मुख्य लेखाशिर्षातंर्गत प्रस्तुत योजनेसाठी राज्यातील नऊ जिल्ह्यांसाठी नियोजन विभागाने उपलेखाशिर्ष निर्माण केले असून उर्वरित जिल्ह्यांसाठी उपलेखाशिर्ष उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही नियोजन विभागाकडून करण्यात येईल.

१२. सदर शासन निर्णय नियोजन विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक ०२/१४८१, दिनांक ०४/०१/२०१७ व वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक ४३/१७/व्यय-६, दिनांक १८/०२/२०१७ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०३१७१७४६२९४२०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

S.G. Patil

Digitally signed by S.G. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SDED, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f64f9296da4ba15d02d3ad3826a21a74ed080355ac04eef5617c3b4f08af47ae, cn=S.G. Patil
Date: 2017.03.17 17:49:29 +05'30'

**(सं.गि.पाटील)**
उपसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२. सर्व मा.मंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई,
५. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,

६. मा.मुख्य सचिव, मंत्रालय , मुंबई,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई,
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, कफ परेड, मुंबई,
१०. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई,
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१३. महालेखापाल (लेखा परीक्षा) -१, महाराष्ट्र, मुंबई,
१४. महालेखापाल (लेखा परिक्षा) -२, महाराष्ट्र, नागपूर,
१५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/सर्व जिल्हा कोषागार कार्यालय
१६. निवासी व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१७. सर्व विभागीय आयुक्त,
१८. सर्व जिल्हाधिकारी,
१९. सर्व जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती,
२०. आयुक्त सर्व महानगरपालिका,
२१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२२. मुख्याधिकारी, सर्व नगर परिषद/नगर पंचायती,
२३. संचालक (प्रशिक्षण/व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२४. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक,
२५. उपसंचालक, विभागीय मुख्यालय कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मुंबई/पुणे/नागपूर/अमरावती/औरंगाबाद /नाशिक,
२६. सर्व सहाय्यक संचालक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता
२७. सर्व कार्यासने, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई,
२८. निवड नस्ती.

********

**शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/प्र.क्र.५६/अभियान-१, दिनांक १६/०३/२०१७**

**सोबतचे परिशिष्ट-अ**

**जिल्हानिहाय शहरांचा दर्जा**

| अ.क्र. | जिल्हा | शहर | गट |
|---|---|---|---|
| १ | मुंबई | बृहन्मुंबई | अ (X) |
| २ | पुणे | पुणे | अ (X) |
| ३ | अमरावती | अमरावती | ब (Y) |
| ४ | नांदेड | नांदेड | ब (Y) |
| ५ | औरंगाबाद | औरंगाबाद | ब (Y) |
| ६ | नाशिक | नाशिक | ब (Y) |
| ७ | मुंबई | भिवंडी | ब (Y) |
| ८ | सोलापूर | सोलापूर | ब (Y) |
| ९ | नागपूर | नागपूर | ब (Y) |
| १० | ठाणे | वसई-विरार शहर | ब (Y) |
| ११ | नाशिक | मालेगांव | ब (Y) |
| १२ | नांदेड | नांदेड-Waghala | ब (Y) |
| १३ | सांगली | सांगली | ब (Y) |
| १४ | कोल्हापूर | कोल्हापूर | ब (Y) |

टिप : "अ (X)" व "ब (Y)" वर्गीय जिल्ह्यात समाविष्ट नसलेले राज्यातील उर्वरित सर्व जिल्हे "क (Z)" वर्गात समाविष्ट करण्यात आले आहेत.